पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1\. राज्य State महाराष्ट्र   जिल्हा District मुंबई   पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुंबई   पहिली खबर क्र. FIR No. ३७   वर्ष Year २०२६   दिनांक Date २३/१०/२०२६

2\. (i) अधिनियम Act ७   कलमे Sections भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम

(ii) अधिनियम Act ...   कलमे Sections १९८८

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...

3\. (a) अपराधाची घटना Occurrence of offence : वार Day ...   तारीख पासून Date from १६/०८/२०२६   वेळ Time ...   तारीख पर्यंत Date to २३/१०/२०२६   वेळ Time २३.५८

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.००   (2) ०३.०० ते ०६.००   (3) ०६.०० ते ०९.००   (4) ०९.०० ते १२.००   (5) १२.०० ते १५.००

(6) १५.०० ते १८.००   (7) १८.०० ते २१.००   (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S.   तारीख Date १६/०८/२०२६   वेळ Time १०.३० वा.

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ३६   तारीख Date २३/१०/२०२६   वेळ Time ११.३० P.M.

4\. माहितीचा प्रकार Type of Information लाच मागणी   लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5\. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ...   चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ...

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name सहायक पोलीस आयुक्त नायगाव   ठिकाणाचे नंबर No. if any ...   गल्ली Ward ...   रस्त्याचे नाव Name of road ...

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place नायगाव पोलीस कार्यालय   गाव Village ...   पोस्ट Post नायगाव   तालुका Taluka ...   जिल्हा Dist. मुंबई   राज्य State महाराष्ट्र

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ...   तालुका Taluka ...   जिल्हा Dist. ...   राज्य State ...

6\. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name जगदिश वसंत मोरे   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name वसंत मोरे

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ३६ वर्षे   (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय   फोन नं. Phone No. 9767781093

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ...   दिल्याचा दिनांक Date of issue ...   दिल्याचे ठिकाण Place of Issue ...   (f) व्यवसाय Occupation नोकरी (पो.नि.)

(g) धर्म Religion हिंदू   जात Caste मराठा   जनजात Sub-Caste ...

(h) पत्ता Address ...   गल्ली/सर्व्हे नं. Ward ...   घर/नाव नं. House Name No. ...   फोन/मो. नं. Phone No. ...   पॅन नं. Pan No. ...   वोटर्स नं. Card No. ...

रस्त्याचे नाव Road ...   जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ...   गाव Village ...   पोस्ट Post ...   पो. स्टे. P. Stn. ...

नेमणूक - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

तालुका Taluka ...   जिल्हा Dist. ...   राज्य State ...   सध्याचा पत्ता Present Address ...

7\. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

बद्रिनाथ शिवाजी सोरटे, वय ३८ वर्षे, व्यवसाय - नोकरी (वरिष्ठ लिपीक), नेमणूक - अप्पर पोलीस आयुक्त कार्यालय, स.पो.आ. नायगाव, मुंबई. रा.ठि. रुम नं १००३, बिल्डींग नं. १० वा माळा राधाकृष्ण किरीट PWD ... घाटकोपर (पू) मुंबई - 400077.

(G.C.P.) K 1043 (A) (1000-1-2025)

Scanned with OKEN Scanner

## निष्कर्ष :

श्री. जगदिश वसंत मोरे, वय ३६ वर्षे, पद - पोलीस निरीक्षक, नेमणूक - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई असून माझी कार्यालयीन निष्कर्ष स्वतंत्र [illegible] [illegible] करण्यात आली असून तीन निष्कर्ष, गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल म्हणून नोंदविण्यात यावी.

सादर.

(सचिन शेडकर)
पोलीस निरीक्षक,
ला.प्र.वि. मुंबई विभाग.

फिर्याद

दिनांक १३ /१०/२०२६

मी. जगदीश वसंत मोरे, वय ३६ वर्षे, व्यवसाय : नोकरी (पोलीस निरीक्षक), नेमणुक - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग. बृहन्मुंबई . मोबाईल नंबर ९७६७७८१०३३.

मी.वरील प्रमाणे असून, दिनांक ०४/०९/२०२५ पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पोलीस निरीक्षक या पदावर नेमणुकीस आहे.

मी दिनांक १६/०९/२०२६ रोजी ला.प्र.वि.कार्यालयात कर्तव्यावर हजर असताना, मा. अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांनी पडताळणी कारवाई क्रमांक ६५/२०२६ मध्ये माझी 'सापळा अधिकारी' म्हणून व 'पर्यवेक्षक अधिकारी' म्हणुन सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.मच्छिंद्र दिवे यांची नेमणुक केल्याबाबत आदेशीत केले.

नमुद पडताळणी मधील तक्रारदार संजय अर्जुन तांबवे यांचेकडे त्यांच्या लेखी तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा केली. त्यावेळी तक्रारदार संजय अर्जुन तांबवे व्यवसाय- नोकरी (पोलीस उप निरीक्षक) नेमणुक सपो ताडदेव ,रा ठी. रुम न ८, पहिला माळा, बि विंग ऑफिसर्स क्वाटर्स , सिएसटी, मुंबई ०१ मो.क्र. ९३७३७५५२९९ हे एल.ए.ताडदेव (सशस्त्र पोलीस दल-०२, ताडदेव, मुंबई) येथे 'पोलीस उपनिरीक्षक' म्हणून कार्यरत असून, त्यांनी आजारपणामुळे घेतलेल्या २९४ दिवसांच्या वैद्यकीय रजेपैकी २४८ दिवसांचे वेतन मिळणे बाकी असल्याचे सांगितले. तक्रारदार यांच्या पत्नीची प्रसूती जवळ आल्याने त्यांनी थकीत वेतन बिल लवकर मिळण्यासाठी अपर पोलीस आयुक्त यांचे कार्यालय, सशस्त्र पोलीस नायगाव कोष कार्यालयातील लोकसेवक वरिष्ठ लिपिक बद्रीनाथ थोरवे यांची भेट घेतली. त्यावेळी लोकसेवक थोरवे यांनी एकूण थकीत वेतनाच्या १० टक्के किंवा ३५,०००/- रु लाच रक्कमेची मागणी करुन तात्काळ १०,०००/- मागितले. वेतन बिल लवकर मंजुर करण्यासाठी तक्रारदार यांनी लोकसेवक श्री थोरवे यांच्या मोबाईल क्रमांकावर 'फोन पे' (PhonePay) द्वारे १०,०००/- पाठवले. मात्र, उर्वरित लाचेची रक्कम दिल्याशिवाय वेतन निघणार नाही अशी भूमिका लोकसेवक श्री थोरवे यांनी घेतल्याने, तक्रारदार यांना आणखी लाच देण्याची इच्छा नसल्याने भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याकरीता ला.प्र.वि.मुंबई कार्यालय येथे दि.१६/०९/२०२६ रोजी तक्रार अर्ज केला आहे.सदर अर्जासोबत याअगोदर फोनपे व्दारे १००००रु पाठवल्याचा स्क्रीनशॉटची प्रत, व रजेबाबतचा आदेशाची प्रत सादर केली.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी कारवाईकरीता दोन शासकीय पंच नामे १) श्री. प्रविण विजय निखाडे, वय-४०, व्यवसाय - नोकरी,पद-कनिष्ठ लिपिक, उपनिबंधक, सहकारी संस्था, पी विभाग,मुंबई यांचे कार्यालय, ९० फिट रोड, कांदिवली पूर्व, मुंबई - ४००१०१ व २) श्री.नितीन वासुदेव खाचणे, वय ५०, व्यवसाय- नोकरी,पद - वरिष्ठ लिपिक, प्रादेशिक परिवहन अधिकारी बोरीवली यांचे कार्यालय,मुंबई ४०००६८ कार्यालय यांना पाचारण केले. दोन्ही पंचांना तक्रारदार श्री. संजय अर्जुन तांबवे यांच्या तक्रारीविषयी थोडक्यात हकिगत सांगून, तक्रारदार यांचा तक्रारी अर्ज पंचाना वाचण्यास दिला. पंचांचा तक्रारी अर्ज वाचून झाल्यानंतर त्यावर समक्ष म्हणून आम्ही तसेच दोन्ही पंचानी स्वाक्षरी करून सदरचा अर्ज आमचे ताब्यात घेतला.

तक्रारदार श्री. संजय अर्जुन तांबवे यांचे तक्रारीस अनुसरून दिनांक १६/०९/२०२६ रोजी पडताळणी कारवाईचे आयोजन केले. नमुद दिवशी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक बद्रीनाथ थोरवे यांनी तक्रारदार संजय तांबवे यांचे थकित वेतन बिल तयार केल्याचे सांगून एकूण बिल ४,३२,०००/- रुपये इतके असुन त्यातून जी.आय.एस., डी.सी.पी.एस. ची रक्कम वगळून निव्वळ रक्कम ३,८५,५५०/- रुपये इतक्या रकमेचे बिल मंजुरीसाठी पाठवले असल्याचे सांगितले. सदर बिल ट्रेझरी ऑफीस, वांद्रे,मुंबई कार्यालयातून कोणतीही क्युरी (त्रुटी) न काढता लवकर मंजूर करून देण्यासाठी लोकसेवकाने तक्रारदार यांच्याकडे २५,०००/- रुपये (पंचवीस हजार) इतक्या लाचेची मागणी केली. तेव्हा तक्रारदाराने सदर लाचेची रक्कम जास्त होत असल्याचे सांगून, पहिले देण्यात आलेली लाच रक्कम १०,०००/- रुपये यातच करा अशी विनंती केली असता, लोकसेवकाने त्यातील ७,०००/- रुपये त्याच दिवशी अन्य लोकसेवकास दिल्याचे सांगितले व बिल पूर्णपणे ओरिजनल असल्याने कोणतीही तडजोड न करता २५,०००/- रुपये लाच रक्कमेची मागणी केली. सदर पडताळणी दरम्यान लोकसेवक

Scanned with OKEN Scanner

थोरवे यांनी बिल तयार करण्याच्या व मंजुरीच्या मोबदल्यात २५,०००/- रुपये लाच रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. सदरबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला.

दिनांक १६/०९/२०२६ रोजीच्या पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक थोरवे हे लाच रक्कम कुठे व केव्हा स्विकारणार याबाबत उल्लेख केला नसल्याने दिनांक ०७/१०/२०२६ रोजी पुन्हा पडताळणी करण्यात आली. त्यावेळी तक्रारदार तांबवे यांच्या मोबाईल वरून लोकसेवक बद्रीनाथ थोरवे यांच्या मोबाईल क्रमांकावर कॉल करून लाच रक्कमेबाबत बोलणे करुन त्यानंतर पुढील कारवाई करण्याचे नियोजन केले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे मो.न. ९३७३७५५२९९ वरुन लोकसेवक थोरवे यांच्या मोबाईल क्रमांक ९०८२४०४७६५ वर व्हॉटसअॅप व्दारे कॉल करून, फोनचा स्पीकर ऑन केला. कॉल स्विकारल्यावर तक्रारदार संजय अर्जुन तांबवे व लोकसेवक बद्रीनाथ थोरवे यांच्यात तक्रारदाराचे थकित वेतनाचे बिल मंजूर करण्याबाबत आणि थकीत इंन्क्रीमेंट एरिअसबाबत चर्चा झाली. लोकसेवक थोरवे यांनी तक्रारदाराला सांगितले की, आधीचे बिल त्रुटींमुळे परत आले होते, तसेच संबंधित अधिकारी पाटील यांची बदली झाल्यामुळे कामाला विलंब झाला आहे. आता नवीन बिल तयार करून ते मंजुरीसाठी ट्रेझरीकडे पाठवण्यात येईल. नमुद संभाषणादरम्यान तक्रारदाराने कामाच्या मोबदल्यात आधी ठरलेल्या लाचेच्या रकमेमध्ये काही कमी करण्याची विनंती केली असता, 'तुमचे विचाराने करा' असे लोकसेवक थोरवे यांनी सांगितले. थकबाकी वेतन लवकरात लवकर पारित व्हावे याकरीता तक्रारदाराने ट्रेझरी ऑफिस मध्ये पैसे दयायचे असल्यास सुरुवातीला ५ ते १० हजार रुपयांचे पाकीट देईन असे सांगितले असता, लोकसेवक थोरवे यांनी ''ठीक आहे, चालेल चालेल'' म्हणून स्पष्ट संमती दर्शवली. तेव्हा तक्रारदार यांनी सोमवारी किंवा मंगळवारी भेटायला येतो असे सांगितले असता लोकसेवक थोरवे यांनी 'ठिक आहे तुम्ही या' असे बोलून संमती दर्शवली.

लोकसेवक थोरवे यांनी तक्रारदार यांना सोमवार किंवा मंगळवारी बोलाविल्याने दिनांक १३/१०/२०२६ रोजी सापळा कारवाईचे आयोजन करण्यात आले. यातील तक्रारदार संजय तांबवे हे जी. डी.आंबेकर मार्ग, नाना नानी पार्क समोर,नायगाव, दादर पूर्व, मुंबई येथे भेटणार असल्याने मी, सपोआ दिवे, दोन्ही पंच, व पथकातील अंमलदार सापळा कारवाईकरीता आवश्यकत्या साधन सामुग्रीसह दोन शासकिय वाहनाने १२.०० वा. लाप्रवि कार्यालयातून बाहेर पडलो. मी शासकीय वाहन चालक पो.शि. चाक्र.१४०२५०/गारळे व पो.शि.चा. क्र.२१६३९५/साबळे यांना दोन्ही वाहने नायगाव, दादर पूर्व, मुंबई येथे घेण्यास सांगितली.१३.०० वा. आम्ही सर्व जी.डी.आंबेकर मार्ग, नाना नानी पार्क समोर,नायगाव, दादर पूर्व, मुंबई येथे पोहचलो. सदर ठिकाणी थोडया वेळात तक्रारदार संजय तांबवे हे हजर झाले.

त्यानंतर सापळापुर्व कार्यवाही करून सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले. मी व स.पो.आ. मच्छिंद्र दिवे यांनी पंच,तक्रारदार व पथकास सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाची व करावयाची कारवाईबाबत आवश्यक त्या सुचना दिल्या. मी तक्रारदार यांना लोकसेवक बद्रीनाथ थोरवे यांना लाचेची रक्कम दिल्यानंतर इशारा म्हणून सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे वारंवार त्यांचा चष्मा काढुन पुसण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमे बाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील बचतीतील रूपये ५०००/- इतकी रक्कम घेवुन आल्याचे सांगितले. तक्रारदार यांचेकडील उपलब्ध लाचेची रक्कम रू. ५०००/- (त्यामध्ये रू. ५००/- दराच्या भारतीय चलनाच्या १० नोटा) यांची प्रिंट काढण्याकरीता पीडीएफ करण्यात आली असून नोटांवरील क्रमांकांची नोंद करून घेण्यात आली आहे.

त्यानंतर तक्रारदार यांचे खाजगी वाहन क्रमांक एमएच १३ एफसी ३३२४ मध्ये पोशि.चा.क्र. १४०२५०/गारळे यांनी पंच व तक्रारदार यांना अॅन्थ्रोसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून अॅन्थ्रोसिन पावडरचा डेमो दाखविला त्यामध्ये पावडरचा रंगाची फिक्कट निळसर चकाकी दिसून आली. पोशिचा गारळे पुढील कार्यवाही मध्ये सापळा पथकात नसतील असा सुचना दिल्या. सापळा कारवाईमध्ये नविन मेमरी कार्ड वापरण्यात येणार असल्याने मी पोह मटपती यांना सांगुन नविन मेमरी कार्ड हजर करण्यास सांगितले. पोह.मटपती यांनी सादर केलेल्या नवीन मेमरी कार्डमध्ये माझे, पंचांचे व तक्रारदार यांचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत करण्यात आले. पोशि.चा.क्र. १४०२५०/गारळे यांनी लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या

Scanned with OKEN Scanner

रूपये ५०००/- रक्कमेतील नोटांना अॅन्थ्रोसिन पावडर लावून ती लाचेची रक्कम तक्रारदार यांनी परिधान केलेल्या पॅन्टच्या डाव्या बाजूच्या खिशामध्ये ठेवली.

तदनंतर तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टाच्या आतील बाजुस व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच श्री निखाडे यांना लोकसेवकाच्या कार्यालयात भेट घेण्यासाठी तक्रारदार यांच्यासोबत त्यांच्या नमुद खाजगी गाडीतून जाण्यास सांगितले व मी व्हॉईस रेकॉर्डर चालू केला त्यावेळी वेळ १३.२४ होती. सदर सुचनेवरून तक्रारदार व पंच न.०१ प्रविण निखाडे हे लोकसेवकास भेटण्याकरीता लाचेच्या रकमेसह रवाना झाले. त्यांच्या मागोमाग मी, सपोआ दिवे व इतर सापळा पथक असे जावुन लोकसेवक यांच्या सशस्त्र पोलीस कोष कार्यालय,नायगाव,दादर पूर्व,मुंबई येथील कार्यालयाच्या ठिकाणी पाळत ठेवून होतो.

तदनंतर तक्रारदार व पंच हे लोकसेवक काम करत असलेल्या ठिकाणी त्यांचे कार्यालयात गेले. काही वेळाने तक्रारदार हे कार्यालयाच्या बाहेर आले.तक्रारदार यांनी लाचेची रक्कम लोकसेवक थोरवे यांनी स्विकारल्याबाबतचा सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे चष्मा पुसण्याचा पुर्व नियोजीत इशारा केला. त्यानंतर लगेच मी सपोआ दिवे, व सापळा पथकाने पंचासमक्ष लोकसेवक थोरवे यास १३.४२ वा. लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडले. सदर लोकसेवक श्री थोरवे यांना त्याचे पूर्ण नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव श्री.बद्रीनाथ शिवहरी थोरवे, वय - ३९ वर्षे, पद - वरिष्ठ लिपिक, सशस्त्र पोलीस कोष, मा अ.पो.आ. यांचे कार्यालय, स.पो. नायगाव यांचे कार्यालय, नायगाव, दादर पूर्व,मुंबई राठी : रुम नं.१७०३,बिल्डींग क्र.०९, गर्व्हरमेंट कॉलनी, छेडा नगर,रायजिंग सिटी, पिडल्ब्यु डी ग्राउंड, घाटकोपर पूर्व,मुंबई ४०००७७ असे सांगितले. त्यानंतर तळमजला,सशस्त्र पोलीस कोष कार्यालय,नायगाव,दादर येथे आरोपीची अंगझडती, अंथ्रोसीन पावडर गुणधर्म तपासून आरोपी लोकसेकाकडून लाच रक्कम रूपये ५०००/- पंचासमक्ष हस्तगत करण्यात आली. लाच रकमेवर व लोकसेवक श्री थोरवे यांचे दोन्ही हातावर अंथ्रोसीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसून आली. सदरबाबतचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यात आले. त्यानंतर उर्वरीत पुढील कार्यवाहीकरीता आम्ही सर्व ताब्यात घेतलेल्या अंगझडतीतील चिजवस्तू व आरोपी लोकसेवक बद्रीनाथ थोरवे यांचे सह ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात परत आलो व सदर ठिकाणी सापळा कारवाईबाबत सविस्तर पंचनामा केला.

तक्रारदार संजय अर्जुन तांबवे हे सशस्त्र पोलीस दल, ताडदेव,मुंबई यांचे थकीत वेतन बिल तयार करण्यासाठी व सदर बिल ट्रेझरी मधुन मंजुर करून घेण्यासाठी यातिल लोकसेवक श्री बद्रिनाथ थोरवे , वरिष्ठ लिपीक यांनी तक्रारदार अर्जुन तांबवे यांच्याकडे २५,०००/- रू लाचेची मागणी केल्याचे पडताळणी पंचनामा मध्ये दि. १६/०९/२०२६ व दि. ०७/१०/२०२६ रोजी निष्पन्न झाल्याने दि. १३/१०/२०२६ रोजी सापळा कारवाई आयोजित केली असता, लोकसेवक बद्रिनाथ थोरवे यांनी तक्रारदार अर्जुन तांबवे यांचेकडुन लाच रक्कम ५०००/-रू स्विकारल्याने त्यांना पंचासमक्ष रंगेहाथ पकडण्यात आले आहे. म्हणुन माझी लोकसेवक बद्रीनाथ शिवहरी थोरवे यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष,

(सचिन विश्वनाथ शेंडकर)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

जगदीश मोरे

फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ... तक्रार अर्जावरुन पडताळणी केल्यावरुन

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ...

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ... —

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

खालील नमूद तारीख वेळी व ठिकाणी यातील तक्रारदार संजय अर्जुन तांबवे हे स.पो. नाडके येथे पोउपनि. म्हणून नेमणूकीस आहे. श्री. तांबवे यांचे थकित वेतन बिल तयार करण्यासाठी व इतरांसह आरोपी बांद्रा पुन्हा मंजूर करण्यासाठी यातील लोकसेवक [illegible] यांनी श्री. तांबवे यांचेकडे २५००/- रु. लाच मागणी केल्याचे दि. २५/०९/२०२४ व ०१/१०/२०२४ रोजीच्या पडताळणी पंचनाम्यामध्ये निष्पन्न झाल्याने दि. ०३/१०/२०२४ रोजी सापळा कारवाई आयोजित केली असता आरोपी यांनी तक्रारदार श्री. तांबवे यांचेकडून लाच रक्कम रु. ५००/- स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही** -1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : श्रीमती. वैशाली महेश आडागळे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

...

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ... जिल्हा ... राज्य ...

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) ... Rank ... No. ... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ...

(3) Transferred to P. S. ...
District ... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name सचिन विश्वनाथ शेडकर
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अ. चा कोड क्र. ला.प्र.वि. मुंबई
Posting
Code No. of I. O. ...

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ...
1. Date and time of submitted to the Court.

| प्रत<br>Copy to | 2. फिर्यादी,<br>2. Complainant, | 3. पोलीस अधीक्षक ( संगणक ),<br>3. Supdt. of Police (Computer), | 4. तपासिक अंमलदार,<br>4. Inv. Officer, | 5. स्थळ प्रत.<br>5. Office Copy. |
|---|---|---|---|---|

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner